महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
सहावा मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

---

**क्रमांक :निविआ ४०२३ / प्र.क्र.३९० /का.१४२१** **दिनांक: १६/१०/२०२३**

**प्रति,**

संचालक,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

**विषय** अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक या पदावरून संवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून करार पध्दतीने नियुक्तीकरिता जाहिरात देण्याबाबत.

**संदर्भ** १.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७.१२.२०१६ व क्र. संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१००(भाग-१)/ १३, दिनांक ०८सप्टेंबर,२०२३
२. समक्रमांकाचे दि. १२.१०.२०२३ रोजीचे पत्र.

महोदय,

संदर्भ क्र. २ येथील पत्र रद्द करण्यात येत असून, आपणांस कळविण्यात येते की, Maharashtra District Growth and Instituional Capacities Project या प्रकल्पाच्या अनुषंगाने उद्भवणारी कामे, वीदा संविभाजन व उपलब्धता धोरण, तद्नुषंगिक कायदेशीर बाबी व अनुषंगिक कामांमध्ये तांत्रिक सहाय्य व मार्गदर्शन करणे, याशिवाय इतर प्रकल्पांबाबत मार्गदर्शन करणे, मसुदा तयार करणे व त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी, अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ व दिनांक ०८ सप्टेंबर २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करार पध्दतीने नियुक्ती करावयाची असून त्याकरीता प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा सुधारित मसुदा सोबत जोडला आहे.

तरी सदर जाहिरात दिनांक १९/१०/२०२३ रोजी नियोजन विभागाच्या www.plan.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

सोबत : १.जाहिरातीचा नमुना
२.अटी व शर्ती
३. अर्जाचा नमुना

( मनिषा राणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-निवडनस्ती -१४२१

# नियोजन विभाग , मंत्रालय, मुंबई

## अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक (वेतनश्रेणी -एस-२७: १२३१००-२१५९००) या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून करारपध्दतीने नियुक्ती करणेबाबत..

Maharashtra District Growth and Institutional Capacities Project या प्रकल्पाच्या अनुषंगाने उद्भवणारी कामे, वीदा संविभाजन व उपलब्धता धोरण, तद्नुषंगिक कायदेशीर बाबी व कामांमध्ये तांत्रिक सहाय्य व मार्गदर्शन करणे, याशिवाय इतर प्रकल्पांबाबत मार्गदर्शन करणे, मसुदा तयार करणे व त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक वेतनश्रेणी (एस-२७: १२३१००-२१५९००) दर्जाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याची एका वर्षासाठी करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ *www.plan.maharastra.gov.in* वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती पाहून vanita.shirsat@nic.in या मेल आयडी वर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत अर्ज सादर करावा.

(मनिषा राणे)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

**अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक (वेतनश्रेणी -एस-२७: १२३१००-२१५९००) या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून करारपध्दतीने नियुक्ती करणेबाबत..**

विभागाची आवश्यकता :

Maharashtra District Growth and Instituional Capacities Project या प्रकल्पाच्या अनुषंगाने उद्भवणारी कामे, वीदा संविभाजन व उपलब्धता धोरण, तद्नुषंगिक कायदेशीर बाबी व कामांमध्ये तांत्रिक सहाय्य व मार्गदर्शन करणे, याशिवाय इतर प्रकल्पांबाबत मार्गदर्शन करणे मसुदा तयार करणे व त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक (वेतनश्रेणी एस-२७: १२३१००-२१५९००) दर्जाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याची एका वर्षासाठी नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

अटी व शर्ती -:

१. सदर नियुक्ती **केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता** सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१००/ १३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ व क्र. संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१००(भाग-१)/ १३, दिनांक ०८सप्टेंबर,२०२३, च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
२. उमेदवार अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक (वेतनश्रेणी एस-२७: १२३१००-२१५९००) या पदावरुन सेवानिवृत्त झालेला अधिकारी असावा.
३. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.
४. उमेदवाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.
५. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.
६. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
७. उमेदवाराने त्यांचे अर्ज सदर पदाकरिता वेबसाईट वरील माहिती पाहून vanita.shirsat@nic.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून **१० दिवसांच्या आत करावेत.** या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२२५९६/२२७९४११६ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.
८. विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१०. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

११. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६, क्र. संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१००(भाग-१)/ १३, दिनांक १४/०७/२०२१, दि.०८सप्टेंबर,२०२३ च्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे राहतील.

-----

# अर्जाचा नमुना

## अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक (वेतनश्रेणी -एस-२७: १२३१००-२१५९००) या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून करारपध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे. |

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-..................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-..........................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-.......................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक

५) ई-मेल आयडी- :-.....................................................

६) जन्म दिनांक व वय :-................................................

७) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

८) अनुभव (प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून सेवानिवृतीच्या दिनांकापर्यंत सेवा तपशिल)

:-.........................................................................

Maharashtra District Growth and Instituional Capacities Project या प्रकल्पाच्या अनुषंगाने उद्भवणारी कामे, वीदा संविभाजन व उपलब्धता धोरण, तद्नुषंगिक कायदेशीर बाबी व कामांमध्ये तांत्रिक सहाय्य व मार्गदर्शन करणे, याशिवाय इतर प्रकल्पांबाबत मार्गदर्शन करणे, मसुदा तयार करणे व त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी, १ वर्षाच्या कालावधीसाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक वेतनश्रेणी (एस-२७: १२३१००-२१५९००) या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्तीबाबतची नियोजन विभागाची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/ सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण -:

दिनांक -: अर्जदाराची स्वाक्षरी